भाव धरा तुम्ही भाव धरा गुरूचरणीं तुम्ही भाव धरा ॥ धृ ॥

अनन्य भावें जोडुनि पाणी । सर्वस्वातें अर्पुनि चरणी ।
बळकट श्रीगुरू कास धरा ॥ भाव ॥ १ ॥

ज्ञानावांचुनि मोक्षहि नाही । श्रीगुरू वीना ज्ञान न होई ।
मार्ग दाविती संत खरा ॥ भाव ॥ २ ॥

जप तप साधन योगहि दारूण । जरि असे तव मनांत कारण ।
गुरूभक्तीचा पंथ बरा ॥ भाव ॥ ३ ॥

एका भावें हरि वश होता । करणें नलगे कांही चिंता ।
स्वयें वाहिला पाणि धरा ॥ भाव ॥ ४ ॥

भावावांचुनि व्यर्थचि पाहीं । पढों जातां शास्त्रें साही ।
सोडुनी द्या तुम्हीं गर्व बरा ॥ भाव ॥ ५ ॥

गूढ ज्ञान हें शास्त्री ग्रंथीं । सद्गुरू ज्ञानाची बा मूर्ति ।
यास्तव हृदयी नित्य धरा ॥ भाव ॥ ६ ॥

दत्ता दासा जगती नाही । सद्गुरूवांचुनि श्रेष्टहि कांही ।
गुरूनामाचा घोष करा ॥ भाव ॥ ७ ॥